# *अध्याय चौदावा प्रारंभ*



॥ श्री गणेशाय नमः ॥
हे कौसल्यात्मज रामराया । हे रघुकुलभूषणा करुणालया ।
सीतापते करा दया । आतां या लेंकरासी ॥१॥

त्राटिकां त्वां उध्दरली । अहिल्या शिळा सजीव केली ।
शबरीची पुरवली । इच्छा तूं दशरथें ॥२॥

भक्तरक्षणा कारण । सोडिलें नृपसिंहासन ।
वानर केलेसे बलवान । केवळ आपुल्या कृपेंनें ॥३॥

शिळा तरल्या सागरी । तुझ्या नामें रावणारी ।
बसविलास गादीवरी । भक्त आपला बिभीषण ॥४॥

जो जो आला शरण पदा। तुझ्या कीं हे आनंदकंदा।
दैन्य, दुःख, आपदा। त्याच्या त्वां वारिल्यास ॥५॥

हें मनीं आणावें। दासगणूस सांभाळावें।
बालकानें धावावें। जननिविण कोणाकडे ? ॥६॥

तूं जननी जनिता सद् गुरू। तूं भक्तांना कल्पतरू।
भवनदीचें भव्य तारूं। तूंच कीं रे रामराया ! ॥७॥

एक खेर्डेगांवचा। रहिवासी मेहकर तालुक्याचा।
बंडूतात्या नांवाचा। ब्राह्मण होता विबुध हो ॥८॥

हा बंडूतात्या ब्राह्मण। सदाचारसंपन्न।
उदार होते ज्याचें मन। गृहस्थाश्रम चालवी ॥९॥

श्रोते या प्रपंचात। संकटें येती अतोनात।
परी नाहीं पाहा सुटत। लोभ त्याचा मानवा ॥१०॥

या बंडूतात्या घरीं। पाहुणे येती वरच्यावरी।
तों अवघ्यांची साच करी। सरबराई निजांगें ॥११॥

ऐसा क्रम चालला। संचय अवघा संपला।
आली पाळी बिचाऱ्याला। कर्ज काढणें साहूचें ॥१२॥

घरदार पडलें गहाण । अगणित झाले तया ऋण ।
लोकांप्रती दावण्या वदन । लाज वाटूं लागली ॥१३॥

विकावया न कांहीं उरले । सदन अवघे साफ झाले ।
भांडेकुंडें तेंही गेलें । काय विपत्ती वर्णावी ? ॥१४॥

तगादे करिती सावकार । शिपाई धाडून वरच्यावर ।
भागवण्यासी दोन प्रहर । अडचण पडूं लागली ॥१५॥

कांता बोले टाकून । मुलें करिती अपमान ।
पत गेली उडून । उसने न कोणी देती हो ॥१६॥

ऐशा तापें तापला । जीव द्याया तयार झाला ।
पैसा संपतां प्रपंचाला । कांहीं नसे किंमत ॥१७॥

जें सुखाचें वाटें स्थान । तेच दुःखाचें निकेतन ।
संपून गेल्यावरी धन । सहज होतें न्याय हा ॥१८॥

बंडूतात्या विचार करी । जीव कोठें देऊं तरी ।
अफू खाऊन मरूं जरी । तरी ती घ्याया पैसा नसे ॥१९॥

जरी जाऊन विहिरीवरी । जीव हा मी देऊ तरी ।
तितुक्यांत कोणी येऊन वरी । जरी मला काढल्यास ॥२०॥

जीवही ना जाईल । उलटी फजीती होईल ।
सरकार शिक्षा देईल । आत्महत्यारा म्हणून मला ॥२१॥

यापेक्षां हिमालया । जावे वाटे जीव द्याया ।
आत्महत्येचा ते ठायां । दोषही ना लागेल ॥२२॥

ऐसा करूनि विचार । पडला घराच्या बाहेर ।
अखेरचा तो नमस्कार । केला त्यानें प्रपंचाला ॥२३॥

एक लंगोटी घातली । राख अंगा लाविली ।
तयानें ही युक्ति केली । ओळख आपुली बुजवावया ॥२४॥

श्रोते अब्रुदारासी । जननिंदेचे मानसी ।
भय वाटे अहर्निशीं । हें सकळांसी ठाऊक ॥२५॥

बंडूतात्या म्हणे मनीं । हे दीनदयाळा चक्रपाणी ।
अवकृपा मजलागोनी । कां रे ऐसी केलीस ? ॥२६॥

तुझ्यावरी विश्वास माझा । पूर्ण होता अधोक्षजा ।
तूं रंकाचा करिसी राजा । ऐसें ऐकिलें पुराणीं ॥२७॥

ते सर्व खोटें झालें । प्रत्ययासी माझ्या आले ।
व्यर्थ कवींनी रंगविलें । चरित्र तुझें नारायणा ॥२८॥

आतां जीव देतो परी । तुझ्यावरी मी श्रीहरी ।
याचा विचार कांहीं करी । हत्या नको घेऊ मम ॥२९॥

ऐसें मनीं बोलला । तिकिट घ्याया लागला ।
तों एक भेटला । विप्र त्यासी स्टेशनांत ॥३०॥

आतांच हरिद्वाराचे । तिकीट नको घेऊं साचें ।
घेऊन दर्शन संताचें । मग जावें हरिद्वारा ॥३१॥

आपल्या वऱ्हाड प्रातांत । श्रीगजानन महासंत ।
आहेत अवतरले सांप्रत । त्यांच्या दर्शना जाय तूं ॥३२॥

संतदर्शन आजवरी । वायां न गेलें भूमीवरी ।
उगीच त्रासून अंतरीं । भलतें कांहीं करूं नको ॥३३॥

ऐसें बोलतां ब्राह्मण । तात्या गेला गोंधळून ।
म्हणे हा मनुष्य कोण ? । अवचित मसी भेटला ॥३४॥

किंवा यानें ओळखिलें । मी बंडूतात्या म्हणून भलें ।
कांही न माझा तर्क चाले । पुसुं तरी यातें कसा ? ॥३५॥

कांहीं असो शेगांवासी । जाऊन वंदूं समर्थांसी ।
ऐसें बोलून मानसीं । शेगांवासी पातला ॥३६॥

दर्शना गेला ब्राह्मण । तो महाराज वदले हांसून ।
कां रे देशी जाऊन प्राण । हिमालयासी बंडूतात्या ॥३७॥

अरे आत्महत्या करूं नये । हताश कदापि होऊं नये ।
प्रयत्न करण्या चुकूं नये । साध्य वस्तु साधण्यास ॥३८॥

आतां जरी दिलास प्राण । प्रपंचाशीं त्रासून ।
तरी येशील घेऊन । जन्म पुन्हां ते भोगावया ॥३९॥

नको जाऊं हिमालया । गंगेमाजीं प्राण द्याया ।
परत आपुल्या घरीं जाया । वेळ वेडया करूं नको ॥४०॥

तिकीट घेतां जो भेटला । स्टेशनावरी ब्राह्मण तुला ।
ओळखिलें कां सांग त्याला ? । तो कोण होता हें कांहीं ॥४१॥

जा आतां घरीं परत । राहूं नको लवही येथ ।
बापा तुझ्या मळ्यांत । आहे एक म्हसोबा ॥४२॥

त्या म्हसोबाच्या पूर्वेसी । बाभुळीच्या झाडापासी ।
खोदून पहा मेदिनीसी । दोन प्रहर रात्रीला ॥४३॥

काम जमीन खोदण्याचें । तूंच एकटा करी साचें ।
खाली तीन फुटांचें । द्रव्य तुजला सांपडेल ॥४४॥

त्यांतून थोडें कर्जदारां। देऊनी ऋणमुक्त होई खरा।
नको सोडूंस बायकापोरां। उसनें वैराग्य वाहूं नको॥४५॥

ऐसें बोलतां गजानन। आनंदला तो ब्राह्मण।
आला खेर्डयास परतून। राख पुसून अंगाची॥४६॥

रात्रीचिया वेळेला। मळयांत म्हसोबापासी आला।
बाभूळीखालीं लागला। जमीन खोदाया कारण॥४७॥

तों तीन फुटांवर। लागली श्रोते घागर।
एक तांब्याची साचार। वेळणी होती जिच्या मुखा॥४८॥

त्या तांब्याच्या घागरींत। मोहरा सोन्याच्या चार शत।
पडल्या त्याच्या दृष्टीप्रत। मग काय विचारतां ?॥४९॥

करीं घागर घेऊनियां। लागला तेथेंच नाचावया।
जय जय गजानन गुरुराया। ऐसें मुखें बोलून॥५०॥

त्याच द्रव्यें करून। फेडिलें त्यानें अवघें ऋण।
मळा होता पडला गहाण। तोही आणिला सोडवोनी॥५१॥

घडी बसली प्रपंचाची। ही गजाननकृपेनें साची।
वृत्ति बंडूतात्याची। गेली अती आनंदून॥५२॥

जेवीं मृत्यूची घटका भरतां । अमृतकलश यावा हातां ।
वा सागरामाजीं बुडतां । तारू दृष्टीस पडावे ॥५३॥

बंडूतात्यास तैसें झालें । दुःखाचे ते दिवस सरले ।
मग त्यानें पुढें केलें । येणें पहा शेगांवा ॥५४॥

दानधर्म तेथें केला । मोठया प्रमाणामाजीं भला ।
गजाननाच्या पदीं झाला । लीन अनन्यभावानें ॥५५॥

तईं महाराज वदले त्यासी । आम्हांस कां रे वंदिसी ? ।
ज्यानें दिला आहे तुसी । द्रव्यघट तो वंदी तया ॥५६॥

आतां तरी येथून । खर्च करावा सांभाळून ।
उगे न करी उधळेपण । त्यांत नसे सार कांहीं ॥५७॥

जन सुखाचे सोबती । निर्वाणीचा श्रीपती ।
त्याची सदैव करी भक्ती । तो न उपेक्षी कदा तुला ॥५८॥

ऐसा उपदेश ऐकिला । समर्थांसी वंदून भला ।
बंडूतात्या गांवास गेला । आपुल्या अती आनंदे ॥५९॥

एकेकाली सोमवती । पर्व आले निश्चिती ।
जी कां अमावस्या येती । सोमवारीं ती सोमवती हो ॥६०॥

या सोमवतीचें महिमान । पुराणांत केलें कथन ।
या दिवशीं नर्मदास्नान । अवश्य म्हणती करावे ॥६१॥

म्हणून शेगांवची मंडळी । नर्मदेस जाया तयार झाली ।
तयारी त्यांनीं अवघी केली । पडशा वगैरे भरून ॥६२॥

मार्तंड पाटील, बंकटलाल । मारुती चंद्रभान, बजरंगलाल ।
यांनीं केला एक मेळ । ओंकारेश्वरीं जाण्याचा ॥६३॥

बंकटलाल म्हणे अवघ्यांसी । आपण जातो नर्मदेसी ।
घेऊ सांगाते महाराजांसी । स्नान कराया नर्मदेचें ॥६४॥

चौघे मठामाजीं आलें । समर्था विनवूं लागलें ।
ओंकारेश्वरीं गुरुमाऊले । चला आमुच्या समवेत ॥६५॥

तुम्ही असल्याबरोबर । काळाचाही नाहीं दर ।
घाला आम्हांस पायावर । त्या ओंकारेश्वराच्या ॥६६॥

हा अधिकार मातेविना । नाहीं पाहा इतरांना ।
आमुची विनंती हीच चरणा । न्यावे आम्हा नर्मदेसी ॥६७॥

तुम्ही आल्यावाचून । आम्ही न हालूं येथून ।
बालहट्टालागून । जननी तीच पुरवीतसे ॥६८॥

महाराज म्हणाले तयासी। आहे नर्मदा माझ्यापाशीं।
उगीच त्रास द्यायासी। जाऊं कशाला तिला मग ? ॥६९॥

मी या मठांत बैसुन। करीन नर्मदेचें स्नान।
तुम्ही या सारे जाऊन। श्रीओंकारेश्वराला ॥७०॥

तेथे राजा पूर्वकालीं। मान्धाता भाग्यशाली।
होऊन गेला महाबली। दिगंत ज्याची कीर्ति असे ॥७१॥

श्रीशंकराचार्य गुरुवर। यांनी कराया जगदोध्दार।
तेथेंच दीक्षा साचार। परमहंसाची घेतली ॥७२॥

जा जा तुम्ही तया स्थला। भेटा माझ्या नर्मदेला।
मात्र नेऊं नका मला। उगाच आग्रह करून ॥७३॥

आतां पर्वाचे प्रयोजन। नाहीं राहिलें मजलागून।
ऐसें ऐकतां चौघेजण। घट्ट धरिती पायांला ॥७४॥

कांही असो तेथवरी। चला आमुच्या बरोबरी।
लगेच येऊं माघारी। स्नान करूनी नर्मदेचें ॥७५॥

महाराज म्हणाले ठीक ठीक। तुम्हीं दिसता दांभिक।
नर्मदेचे आहे उदक। या आपुल्या विहिरीमध्यें ॥७६॥

तिला टाकून आपण। तेथें कराया गेलो स्नान।
तरी राग येईल दारुण। माझ्या त्या नर्मदेला ॥७७॥

म्हणून सांगतो तुम्हींच जावें। मला न आग्रहा करावें।
माझे वचन मानावें। यांत तुमचें कल्याण ॥७८॥

मग मारुती चंद्रभान। करूं लागला भाषण।
आम्ही घेतल्यावांचुन। आपणां न जाऊं कीं ॥७९॥

समर्थ म्हणाले मी तेथ। आल्या होईल विपरीत।
मग तुम्ही दोष मात्र। देऊं नये आम्हांला ॥८०॥

ऐसें मठांत बोलणें झालें। अवघे ओंकारेश्वरा आलें।
पर्वासाठी मिळाले। लोक तेथें अपार ॥८१॥

नर्मदेचे अवघे घाट। स्त्रीपुरुषांनी भरले दाट।
मुंगीलाही नसे वाट। जाया हराच्या मंदिरी ॥८२॥

कोणी स्नानास उतरले। कोणी संकल्प ऐकू लागलें।
कोणी घेऊन बेलफुलें। जाऊं लागले मंदिरांत ॥८३॥

कोणी बर्फी पेढे खवा। बसून खाऊं लागले मेवा।
थव्यामागें लागला थवा। तेथे भजनकऱ्यांचा ॥८४॥

पर्व संपेपर्यंत । अभिषेकाची मंदिरांत ।
गर्दी झाली अत्यंत । शब्द कोणाचा कोणा न कळे ॥८५॥

रम्यशा त्या ओंकारी । समर्थांची बैसली स्वारी ।
पद्मासन घालूनी कांठावरी । त्या महानदीच्या नर्मदेच्या ॥८६॥

चौघे दर्शन घेऊन आले । समर्था विनवूं लागले ।
आतां पाहिजे सोडिले । जाणें सडकेनें आपणा ॥८७॥

कां की भीड झाली फार । गाडया मोडती वरचेवर ।
बैल गाडीचे बुजार । आहेत आपुल्या त्यांतूनी ॥८८॥

खेडीघाट स्टेशनाला । जाण्यायेण्याचा करार केला ।
गाडीवाल्यानें तो भला । न सांगतां गुण बैलांचें ॥८९॥

ते बसतां आले कळून । आपण होतां म्हणून ।
पोंचलों येथे येऊन । बैल द्वाड गाडीचें ॥९०॥

परत बसून गाडींत । जाणें न निर्भय वाटत ।
म्हणून या नावेंत । बसून जाऊं स्टेशनाला ॥९१॥

गर्दी झाली रस्त्यांनी । नदीतून जाऊ शांतपणीं ।
ऐसेच केलें कित्येकांनीं । त्या पाहा नावा चालल्यात ॥९२॥

तुम्हांस वाटेल, तेच करा। आम्हां न कांहीं विचारा।
मी वचनांत गुंतलो खरा। तुम्ही बसाल तेथें येऊं ॥९३॥

ऐसें समर्थ बोलले। त्यांच्यासवे नावेंत बैसले।
गर्दीतून जाऊं लागले। खेडीघाट स्टेशनाला ॥९४॥

तों नदींत मध्यंतरी। नाव आदळली खडकावरी।
फळी फुटून गेली सारी। तिच्या बुडाची एक हो ॥९५॥

छिद्र पडलें आरपार। येऊं लागले आंत नीर।
नावाडयानें सत्वर। नदींत उडया टाकिल्या ॥९६॥

परी महाराज निर्धास्त होते। 'गिन गिन गणांत बोते'।
ऐसे भजन मुखातें। चाललें होतें अखंड ॥९७॥

मार्तंड बजरंग मारुती। घाबरून गेले अती।
उडू लागली धडाधडा छाती। बंकटलालाची विबुध हो ॥९८॥

चवघे समर्था बोलले। आम्ही अपराधी आहों भले।
आम्ही न तुमचे ऐकिले। शेगांवांत दयाळा ॥९९॥

त्याचें दिले आम्हां फळ। तुम्ही आज तात्काळ।
नर्मदाच झाली काळ। आम्हालागी बुडवावया ॥१००॥

गुरुराया ! आपुली वाणी । वेदतुल्य मानू येथूनी ।
वांचवा या संकटातूनी । शेगांव दृष्टी पडू द्या ॥१॥

ऐसें जो ते बोलतात । तो निम्म्यावरी पाण्यांत ।
नाव बुडाली लोटत लोटत । एक फर्लांग गेली हो ॥२॥

कांठी लोक बोलती ऐसें । मेली ही पांच माणसें ।
आतां यांचा भरवंसा नसे । अथांग पाणी नर्मदेला ॥३॥

तई म्हणाले गजानन । नका होऊं हैराण ।
तुमच्या जीवालागून । धक्का न लावी नर्मदा ॥४॥

ऐसें म्हणून स्तवन केलें । नर्मदेचें त्यांनी भले ।
हे चवघे बैसले । हात जोडून नावेंत ॥५॥

श्लोक (अनुष्टुप छंद)
नर्मदे मंगले देवी । रेवे अशुभनाशिनी ।
मंतु क्षमा करी यांचा । दयाळू होऊन मनीं ॥

ऐसें स्तवन चाललें । तों आतील पाणी निघून गेलें ।
नर्मदेनें लाविलें । आपुल्या करांस त्या छिद्रा ॥६॥

नाव श्रोते पहिल्यापरी । आली जलाचिया वरी ।
त्या नावेच्या बरोबरी । होती प्रत्यक्ष नर्मदा ॥७॥

कोळीणीचा धरिला वेष । मस्तकावरी कुरळ केश ।
भिजविले जियेच्या वस्त्रास । कंबरेपर्यंत जलानें ॥८॥

नौका कांठास लागली । अवघ्यांनी ती पाहिली ।
आश्चर्यचकित मुद्रा केली । पाहून तळाच्या छिद्राला ॥९॥

ही बाई होती म्हणून । आमुचे हे वांचले प्राण ।
बाई आपण कोठील कोण ? । हे कांही सांगा हो ॥११०॥

सोडा वस्त्र भिजलेले । आम्ही नवें देतो भलें ।
तई नर्मदेनें पहा केलें । अशा रीतीनें भाषण ॥११॥

मी ओंकार कोळ्याची कन्यका । माझें नांव नर्मदा ऐका ।
आम्हां परिपाठ आहे देखा । ओले वस्त्र नेसण्याचा ॥१२॥

मी ओलीच राहतें निरंतर । माझें रूप आहे नीर ।
ऐसें बोलून नमस्कार । करून गेली गजानना ॥१३॥

क्षणामाजी नाहीशी । झाली ती नर्मदेसी ।
वीज चमकून आकाशी । घनीं जैसी लीन होते ॥१४॥

तो पाहतां प्रकार । चवघे आनंदले फार ।
कळला स्वामींचा अधिकार । नर्मदा आली दर्शना ॥१५॥

बंकट विचारी खोदून। समर्था ही स्त्री कोण ?।
ते सांगावें फोडून। गुप्त कांहीं ठेवूं नका ॥१६॥

तई महाराज वदलें तत्त्वतां। तुम्ही जे कां विचारितां।
तो कथिला आहे गाथा। नर्मदेनें तुम्हांस ॥१७॥

कोळी जो का ओंकार। तोच हा ओंकारेश्वर।
माझेंच रूप आहे नीर। ऐसे नर्मदा वदली ना ॥१८॥

अरे ती प्रत्यक्ष नर्मदा। संशय तेथें न घ्यावा कदा।
संकटामाजी देते सदा। हात ती आपुल्या भक्तातें ॥१९॥

म्हणून तिचा जयजयकार। करा मोठयानें एक वार।
जय जय नर्मदे निरंतर। ऐसेंच रक्षण अंबे करी ॥१२०॥

ऐसे ऐकतां वचन। बंकटलालादि चवघे जण।
समर्थांचे दिव्य चरण। वंदूं लागलें क्षणक्षणां ॥२१॥

परत आले शेगांवांत। ज्यांना त्यांना हीच मात।
होऊनिया हर्षभरित। सांगू लागले विबुध हो ॥२२॥

सदाशिव रंगनाथ वानवळे। एक्या गृहस्थासमवेत भलें।
शेगांवांत येते झाले। महाराजांच्या दर्शना ॥२३॥

या सदाशिवाकारण । टोपण नांव तात्या जाण ।
हे माधवनाथाचे छात्रगण । चित्रकूटच्या होते हो ॥२४॥

या माधवनाथाप्रत । योगांगें होती अवगत ।
ज्यांचा शिष्यगण माळव्यांत । आहे मोठया प्रमाणीं ॥२५॥

सदाशिव आले शेगांवाला । जेव्हा श्रींच्या दर्शनाला ।
तेव्हां महाराज भोजनाला । बसले होते मठांत ॥२६॥

सदाशिवासी पाहून । माधवाची झाली आठवण ।
गजाननाकारण । संत संता जाणती ॥२७॥

वानवळे येतांक्षणी । महाराज बोलले मोठयांनीं ।
अरे नाथाच्या शिष्यालागुनी । बसवा आणून माझ्यापुढें ॥२८॥

त्यांचे गुरू माधवनाथ । गेले जेवून इतक्यांत ।
मठीं माझ्या समवेत । तो हे दोघे पातले ॥२९॥

थोडा वेळ आधी जरी । हे आले असते तरी ।
भेट त्यांच्या गुरूची खरी । होती यांना मठांत ॥१३०॥

आतां हे मागून आले । गुरू त्यांचे निघून गेले ।
विडा न घेता भले । त्याची करू पुर्तता ॥३१॥

वानवळ्यासी आलिंगन। देते झाले दयाघन।
पोरे बंधूंचीं म्हणून। ऐसा तो संतप्रेमा ॥३२॥

रीतिप्रमाणें सत्कार केला। वानवळ्याचा शेगांवाला।
जातांना त्या निरोप दिला। समर्थांनी येणे रीति ॥३३॥

तुम्हीं माधवनाथाला। असेंच जा भेटण्याला।
त्यांचा येथें राहिला। विडा तो त्या द्यायास ॥३४॥

मी म्हणतो तेच सांगा। पदरचे न घाला बघा।
आमच्या वाक्यामाजी उगा। फरक तुम्हीं करूं नये ॥३५॥

म्हणा "साथें भोजन हुवा। बिडा तुम्हारा याही रहा।
तो आम्ही आणिला पाहा। नाथा तुम्हा द्यावयास" ॥३६॥

हें सारें बोलणें। ऐकलें त्या वानवळ्यानें।
घेऊन विडयाची दोन पानें। गमन करिता जाहला ॥३७॥

माधवनाथा हकीकत। त्यानें कथिलीं इत्थंभूत।
महाराज आपण शेगांवांत। आला होता कां ते दिनीं ? ॥३८॥

गजानन जे बोलले। तैसेच आहे जाहलें।
भोजनसमयीं त्यांनी केलें। स्मरण माझें तीच भेट ॥३९॥

ऐशा रीति एकमेकां। आम्ही भेटतो सदैव देखा।
येथें शंका घेऊं नका। स्मरण तीच भेट होय ॥१४०॥

त्यांचा माझा एक प्राण। शरीरें ही मात्र भिन्न भिन्न।
हें आहे खोल ज्ञान। तें न इतुक्यात कळें तुम्हां ॥४१॥

बरें झालें आणिला। आमुचा विडा तुम्हीं भला।
जो होता राहिला। शेगांवी शिष्य हो ॥४२॥

पानें देतां वानवळ्यांनीं। ती भक्षिली नाथांनी।
खलबत्त्यांत कुटूनी। थोडा प्रसाद दिला त्याला ॥४३॥

संतभेटी होती कैसी। हें चांगदेवपासष्टीसी।
सांगतें झालें ज्ञानराशी। श्रीज्ञानेश्वर महाराज ॥४४॥

ती पासष्टी मनीं आणा। म्हणजे ह्या कळतील खुणा।
स्वानुभवाच्या ठायीं जाणा। वाव न तर्काकारणें ॥४५॥

योगी वाटेल तेथोनी। भेटे एकमेकां लागूनी।
भेट ठायींच बैसोनी। होते त्यांचे कौतुक हें ॥४६॥

शेख महंमद श्रीगोंद्यांत। तुकाराम होतें देहूंत।
आग लागतां मंडपाप्रत। देहूमाजीं कीर्तनाच्या ॥४७॥

ती शेख महंमदांनी । विझविली श्रीगोंद्यांत बैसूनी ।
हें महिपतींनीं लिहूनी । ठेविले भक्तिविजयांत ॥४८॥

जाऊन हळी खेडयांत । विहिरींत बुडतां पाटीलसुत ।
वांचविले देऊन हात । महाराज माणिकप्रभूंनी ॥४९॥

खरा योगी असल्याविना । ऐसे कौतुक होईना ।
हें न साधे दांभिकांना । त्यांनीं गप्पाच माराव्या ॥१५०॥

योग अवघ्यांत बलवत्तर । त्याची न ये कोणां सर ।
करणें असल्या राष्ट्रोध्दार । त्याचा अवलंब करा हो ॥५१॥

श्रीदासगणूविरचित । हा गजाननविजय नामें ग्रंथ ।
ऐकोत सदा प्रेमळ भक्त । निष्ठा ठेवून ग्रंथावरी ॥१५२॥

शुभं भवतु ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥
॥ इति श्री गजानन विजय ग्रंथस्य चतुर्दशोऽध्यायः ॥

@@@@@